# नियमित दिवाणी दावा क्र. २८६/२०१२

## निशाणी ४५ लगत आदेश

(मौला उर्फ मोहन वि. होवाळ वगैरे वि. ज्ञानेश्वर आ. वाघमारे वगैरे )

१. प्रस्तुतचा अर्ज वादींतर्फे कोर्ट कमिशनर म्हणून तालुका भूमी अभिलेख, उपअधिक्षक, सांगोला यांची नियुक्ती होणेकरिता दाखल केलेला आहे.

वादींचे कथनाप्रमाणे वादीने अर्ज निशाणी २९ कडे कोर्ट कमिशनर नेमणुकीकरीता दिला होता. सदरचा अर्ज नामंजुर केला आहे. त्या आदेशाविरुध्द वादीने मा. उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल केले होते. त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. १२/०७/२०१६ रोजी वादीने पूर्वी दिलेल्या अर्जातील कारण नमूद करुन पुन्हा नव्याने अर्ज देणेबाबत आदेश केलेला आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा अर्ज दिला आहे.

२. वादीचे पुढे कथन आहे की, प्रस्तुतचा दावा हद्दीखुणा ठरवुन मिळणेचा निरंतर ताकीदीचा व वैकल्पीक अतिक्रमीत जमीनीचा ताबा मिळणेकरीता आहे. गट नं. २७१ मध्ये वादी व प्रतिवादी यांची आणेवारी नुसार प्रत्यक्ष मालकी असुन त्याप्रमाणे कब्जे वहिवाट आहे. पूर्वेकडील बाजूस प्रतिवादी क्र. १ यांचे ७ आर मालकीची मिळकत आहे. प्रतिवादी क्र.१ ला लागुन पश्चिम बाजूस ४१ आर हे प्रतिवादी क्र.२ यांच्या मालकी व कब्जेवहिवाटीची आहे. प्रतिवादी क्र.२ च्या पश्चिमेस लागुन वादीचे ४१ आर मिळकतीमध्ये कब्हे वहिवाट आहे. अशा परिस्थितीत, प्रतिवादी क्र.१ यांनी पूर्व बाजूकडील बांध फोडुन अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला. वादी व प्रतिवादी यांच्या जमीनीचा कायमचा वाद मिटविण्यासाठी वादी व प्रतिवादी यांचे जमीनीची मोजणी होणे आवश्यक आहे. त्यासाठी कोर्ट कमिशनर यांची नियुक्ती होऊन गट नं. २७१ मधील हिश्याचे आणेवारीनुसार हद्दीखुणा निश्चित करण्यासाठी वस्तुस्थिती रेकॉर्डवर येणेसाठी आदेश करण्यात यावा अशी विनंती केली.

३. प्रस्तुतच्या अर्जास प्रतिवादीतर्फे नि. ४५ कडे आपले म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे अर्जातील संपूर्ण मजकुर खोटा व लबाडीचा असुन तो या प्रतिवादी यांना मुळीच मान्य व कबुल नाही. प्रतिवादींच्या कथनानुसार प्रस्तुतचा दावा हा अतिक्रमीत जमीनीचा कब्जा मिळण्यासाठी आहे. दावा जमीनीत सामायिकात आणेवारीमध्ये

असल्याने प्रथम वाटप होऊन घेणे आवश्यक आहे. गट नं. २७१ ही मिळकत प्रतिवादी क्र.१ चे वडील व चुलते यांचे वडिलार्जित मालकीची होती. त्यांच्यामध्ये सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. असे असताना वादी क्र.१ यांनी वादी क्र. २ व प्रतिवादी क्र.२ यांना प्रत्येकी ४१ आर क्षेत्र खरेदी दिलेले आहे. वादीने आपल्या मर्जीप्रमाणे ७/१२ पत्रकी नमूद केलेले क्षेत्र चुकीचे असल्याने मोजणी करता येणार नाही.

४. वादीने मा. उच्च न्यायालयात दाखल केलेले मूळ कमीशन अर्जाचे ऑर्डर विरुध्दचे रिट पिटीशन काढुन घेऊन पुन्हा कमीशनचा अर्ज देणेस परवानगी घेतली असली तरी मूळ अर्जात व या अर्जात कसलाही बदल केला नाही. प्रतिवादी क्र.१ चे क्षेत्र व दिशा निश्चित झाल्याशिवाय मोजणी करु शकत नाहीत. अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींचे नुकसान होणार आहे.

५. दोन्ही पक्षकारांतर्फे युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांची पडताळणी केली असता, अर्ज निशाणी २९ हा कोर्ट कमिशनर नियुक्तीसाठी केलेला असुन सदर अर्ज निश्चित क्षेत्र आणि चतुःसिमा नसल्यामुळे मोजणी अधिकाऱ्यास मोजणी करणे शक्य होणे नसल्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात आलेला आहे. तसेच मा. उच्च न्यायालयाचा आदेश पडताळुन पाहिला असता रिट पिटीशन नं. ९८६५/२०१३ हे काढुन घेतल्याने विनंती प्रमाणे मुभा देऊन निकाली करण्यात आलेले आहे. सदर निकालामध्ये इतर निर्देश दिलेले नाहीत. त्यामुळे प्रस्तुत अर्ज स्वतंत्रपणे विचारात घेणे आवश्यक आहे.

६. वादीचे दाव्याचे कथनावरुन गट नं. २७१ ही मिळकत वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये आणेवारीप्रमाणे सामायिक कब्जे वहिवाटीत असल्याचे दिसुन येते. वादीने दावा मिळकतीस नमूद केलेल्या चतुःसिमापूर्व क्षेत्र वादीस कशाचे आधारे मिळाले याबाबत वादीने स्पष्टपणे नमूद केलेले नाही. तसेच इतर प्रतिवादींनी त्यास मान्यता दिलेली नाही. अशा परिस्थितीत, कमिशनर यांची नियुक्ती केली तरी देखील वादी प्रतिवादींचे क्षेत्र, चतुःसिमापूर्वक निश्चित नसल्यामुळे मोजणी होऊ शकत नाही. पर्यायाने अतिक्रमीत क्षेत्र अभिलेखावर येऊ शकत नाही. अशा परिस्थितीत, वादी–प्रतिवादींचे सदर मिळकतींचे आणेवारीप्रमाणे वहिवाट असली तरी देखील सदर गट त्यांच्यामध्ये वाटप झालेला नाही किंवा सदर गट नंबरमध्ये त्यांचे क्षेत्र निश्चित कुठे आहे हे अभिलेखावर आलेले नाही. त्यामुळे या कारणास्तव कमीशन करुन विनाकारण वेळ घालविणे योग्य नाही. अर्ज नामंजूर

केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो –

**आ दे श**

अर्ज (नि. ४५) नामंजूर करण्यात येतो.
( आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

SEEMA KETAN DESHMUKH
Digitally signed by SEEMA KETAN DESHMUKH
Date: 2022.11.18 13:59:24 +0530

सांगोला. (सौ. एस. के. देशमुख)
दिनांक –१६/११/२०२२ दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
सांगोला.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S. P. Parekar |
| (b) | Court | : | Mrs. S. K. Deshmukh,<br>Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C., Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 16/11/2022 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 16/11/2022 |